# महत्त्वाचे

## बाभळेश्वरला शुक्रवारपासून कुक्कुटपालन प्रशिक्षण

**राहाता (प्रतिनिधी)–** कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथे दोन दिवसीय कुक्कुटपालन प्रशिक्षण शुक्रवार दि. २९ आणि ३० ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्राचे प्रमुख शैलेश देशमुख यांनी दिली. प्रशिक्षणामध्ये कोंबड्यांच्या विविध जाती, अर्थशास्त्र, पैदासशास्त्र, आहार, रोग आणि उपचार विषयी तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. यात गावरान कोंबडी पालन तसेच बॉयलर आणि अंडी उत्पादन याविषयी माहिती देण्यात येणार आहे. किमान आठवी पास शैक्षणिक पात्रता असून वयोमर्यादा १८-३५ आहे. प्रशिक्षणादरम्यान प्रत्यक्ष कार्यानुभव, अभ्यास दौरा, प्रकल्प अहवाल आणि विविध शासकीय योजना यावर भर असणार आहे. तरी इच्छुक आणि गरजूंनी केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन केंद्राच्यावतीने करण्यात आले आहे.

## गुरूवर्य तुकाराम बाबा विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची ग्रामपंचायतीला क्षेत्रभेट



**कोपरगाव (प्रतिनिधी)–** तालुक्यातील कुंभारी येथील रयत शिक्षण संस्थेच्या गुरुवर्य तुकाराम बाबा माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी क्षेत्र भेटी दरम्यान कुंभारी ग्रामपंचायत कार्यालयाला भेट दिली. यावेळी ग्रामपंचायत प्रशासनाचा कारभार कसा चालतो याबाबत विद्यार्थ्यांनी सरपंच देवयानी घुले यांच्याशी संवाद साधला. ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर कहार यांनी प्रशासकीय कामाची विद्यार्थ्यांना माहिती दिली. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचा भाग म्हणून ग्रामपंचायत कार्यालयाला शैक्षणिक क्षेत्र भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी सरपंच सौ. देवयानी घुले व ग्रामविकास अधिकारी ज्ञानेश्वर कहार यांच्याशी थेट संवाद साधत स्थानिक स्वराज्य संस्थाचे काम कशा पद्धतीने चालते याची सखोल माहिती घेतली. याप्रसंगी उपसरपंच कविता निळकंठ, सदस्य दिलीप ठाणगे, ज्योती आहिरे, संजय ठाणगे, राहुल पवार, वैशाली बढे, मनीषा घुले, रंजना गायकवाड, रंजना वारुळे, रामराव चंदनशिव, अनिकेत कदम आदी मान्यवरांसह शिक्षक, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हरकती न घेता निवडणुकीला सामोरे जा- त्रिभुवन

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** श्रीरामपूर नगर परिषदेची नव्याने जाहीर झालेली प्रभाग रचना पूर्णतः नियमानुसार असून, तीच रचना अंतिम राहणार असल्याने इच्छुक उमेदवारांनी हरकती किंवा अपिलात वेळ न दवडता थेट निवडणुकीच्या तयारीला लागावे, असे आवाहन रिपाइंचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी केले आहे. नुकतीच नगरपरिषदेने प्रभागरचना प्रसिद्ध केली, काही इच्छुक उमेदवारांनी या रचनेवर नाराजी व्यक्त केली आहे. काहींच्या मते, त्यांच्या समर्थकांचा भाग इतर प्रभागात गेलेला आहे. यावर भाष्य करताना त्रिभुवन म्हणाले की, ही प्रभाग रचना निवडणूक आयोगाने सर्व नियमांचे पालन करून केली असून, हरकतींचा काही परिणाम होणार नाही. त्यामुळे अपिलाच्या भानगडीत न पडता कामाच्या जोरावर मतदारांमध्ये जनसंपर्क वाढवावा. प्रभाग रचनेवर हरकत न घेता, आपल्या कार्याचा आलेख उंचावत मतदारसंघात सक्रीय राहा, आणि निवडणुकीला तोंड द्या, असेही त्यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

## भाजपा कामगार तालुका प्रमुखपदी नानासाहेब वानखेडे

**शिरसगाव (वार्ताहर)–** पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली भाजपा जिल्हा उपाध्यक्ष दीपक पटारे, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे यांच्या मार्गदर्शाखाली असंघटीत बांधकाम कामगारांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी श्रीरामपूर तालुका कामगार प्रमुखपदी नानासाहेब वानखेडे यांची तर सचिवपदी विठ्ठल सोमवंशी यांची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल महांकाळवाडगाव सरपंच अश्विनी चोरमल, कामगार संघटना संस्थापक गणेश छल्लारे, राज्य सचिव दीपक नवगिरे, अशोक कार्ले, जिल्हा उपप्रमुख संदीप कांबळे, नामदेव महांकाळ, गोकुळ त्रिभुवन, जमादार शेख, नजीर शेख, कामगार सेवक फारुख शेख, नामदेव घोगरे, अंकुश खरुद, गोकुळ खुरुद, संदीप घोगरे आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## करजगावच्या छत्रपती शिवाजी विद्यालयात पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा



**करजगाव (वार्ताहर)–** नेवासा तालुक्यातील करजगाव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात पर्यावरण पुरक गणेश मुर्ती कार्यशाळा पार पडली. शालेय उपक्रम, सांस्कृतिक विभाग व गुरुकुल उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना पर्यावरण पुरक गणेश मुर्ती कशी बनवायची याबाबत माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, कौशल्यविकास व पारंपरिक सणांविषयीची जाणीव व्हावी यासाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मुख्याध्यापक एस. बी. बनकर, पर्यवेक्षक वाय. एफ. पठाण, सांस्कृतिक विभाग प्रमुख श्रीमती डी. एन. बिडवे, श्रीमती एस .व्ही. नगरे, कलाशिक्षक श्री. सय्यद आदीसह शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

सार्वमत ५० सुवर्णमहोत्सव १९७६-२०२६

# ग्रामीण भागातील क्रीडा क्षेत्राला दिशा देणारे दैनिक 'सार्वमत'

मागील ३१ वर्षांपासून क्रीडा क्षेत्रात कार्यरत राहून, ग्रामीण भागातील ५० हून अधिक खेळाडूंना मार्गदर्शन करण्याची संधी मला लाभली. या सर्व खेळाडूंनी राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या या प्रवासात सतत त्यांच्या निवडीच्या, कामगिरीच्या बातम्या दैनिक सार्वमतमध्ये झळकत राहिल्या. आज हेच खेळाडू विविध क्षेत्रांत यशस्वी झाले असून त्यांच्या या यशामागे सार्वमतचा मोलाचा वाटा आहे.

ग्रामीण भागातील खेळाडूंना सार्वमतच्या माध्यमातून मागील ५० वर्षांपासून एक हक्काचे व्यासपीठ मिळाले. जिल्ह्यातच नव्हे तर तालुक्याच्या खेडोपाड्यांत क्रीडा संस्कृती रुजवण्याचे कार्य या वृत्तपत्राने सातत्याने केले. ज्येष्ठ पत्रकारांनी सार्वमतला क्रीडा क्षेत्रातील लेखणीची परंपरा दिली. त्यामुळे अनेक नामांकीत खेळाडूंना यातून प्रेरणा मिळाली.

कित्येक खेळाडूंना सार्वमतमध्ये प्रसिद्ध झालेल्या बातम्यांच्या कात्रणामुळे विविध ठिकाणी नोकरीच्या संधी मिळाल्या. त्यांच्या आयुष्यात योग्य ती ओळख निर्माण करण्यात या वृत्तपत्राने सिंहाचा वाटा उचलला आहे. जिल्ह्यातील अशी कुठलीही शाळा नसेल, की जिथे दर्शनी फलकावर अथवा शोकेसमध्ये दैनिक सार्वमतची कात्रणे लावलेली नसतील. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, शैक्षणिक घडामोडी अशा विविध विषयांवरील या कात्रणांमधूनच सार्वमतच्या पन्नास वर्षांच्या महतीची जाणीव स्पष्ट दिसून येते.

शिर्डीच्या साईनगरीमध्येही क्रीडा संस्कृती रुजवण्यासाठी सार्वमतने मोलाचे योगदान दिले आहे.साईबाबा संस्थानचे अनेक राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू विविध स्पर्धांमध्ये कामगिरी करत असताना त्यांना सार्वमतने आपल्या लेखणीच्या माध्यमातून सतत प्रेरणा दिली. फक्त क्रीडा क्षेत्रातच नाही, तर समाजजीवनाच्या प्रत्येक घटकात सार्वमतने ५० वर्षांचा सुवर्णप्रवास घडवला आहे.



**राजेंद्र कोहोकडे**
राष्ट्रीय क्रीडा मार्गदर्शक,
श्री साईबाबा संस्थान
शैक्षणिक संकुल शिर्डी

आपला सार्वमत

शेतकरी, कामगार, उद्योग, शिक्षण, संस्कृती, कला, सामाजिक आंदोलन या सर्वच क्षेत्रांत सार्वमतने जनतेचा आवाज बुलंद केला. आज कितीही वेगवेगळे सोशल मीडियाचे प्लॅटफॉर्म आले तरीही सार्वमतचे वाचक त्याच पटीने वाढत राहतील, हे निश्चित आहे. आजच्या डिजिटल युगात देखील सार्वमतचे वाचन ऑनलाईन माध्यमातून देशोदेशी पोहोचले आहे. महाराष्ट्राची माती, संस्कृती आणि घडामोडी जगभरातील मराठी मने जोडण्याचे कार्य सार्वमत करीत आहे. सार्वमतची ही परंपरा केवळ वृत्तपत्रापुरती मर्यादित नाही, तर ग्रामीण भागातील क्रीडा संघटनांच्या नेतृत्वाखाली उदयास येणाऱ्या नवनवीन खेळांना प्रसिद्धी देऊन त्यांना नवे आयाम देणारे व्यासपीठ ठरले आहे. आज कबड्डी, खो-खो, तायक्वांदो, व्हॉलीबॉल, टेबल टेनिस, बुद्धिबळ, फुटबॉल यांसारख्या विविध खेळांमध्ये ग्रामीण पातळीवरून अनेक खेळाडू घडत आहेत. आणि त्यांचा प्रवास लोकांसमोर आणण्याचे कार्य सार्वमत सातत्याने करीत आहे. साईचरणी प्रार्थना आहे की, दैनिक सार्वमत कायम उच्च शिखरावर राहो, यशाची नवी पर्वे गाठो, आणि समाजमनाचा दीपस्तंभ म्हणून सतत तेजोमय राहो. प्रत्येकाच्या सुखदुःखातला साथी- दैनिक सार्वमत..! दैनिक सार्वमतला सुवर्ण महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा...!

# धार्मिक स्थळाच्या तोडफोडीची सखोल चौकशी करावी

### खासदार लंके यांची एसपींकडे मागणी

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)–** रविवारी पहाटे आनंदीबाजार परिसरातील धार्मिक स्थळाच्या तोडफोडीमुळे शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील सामाजिक सलोखा व बंधुत्वाला धक्का देणारी ही घटना असल्याचे नमुद करत खासदार नीलेश लंके यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन निष्पक्ष चौकशी व दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

खा. लंके यांनी मंगळवारी घार्गे यांची भेट घेत निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, माजी महापौर अभिषेक कळमकर आदी उपस्थित होते. खा. लंके यांनी निवेदनात नमुद केले आहे की, सुमारे शेकडो वर्षापासून अस्तित्वात असलेले धार्मिक स्थळ हे श्रध्दास्थान आहे. या ठिकाणी झालेल्या तोडफोडीच्या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने काही संशयितांना ताब्यात घेतले आहे, मात्र चौकशी वेगाने करून त्यांच्यावर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी स्पष्ट केले. या निवेदनात खा. लंके यांनी विविध मागण्या केल्या आहेत. आनंदीबाजार येथील प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई करावी, राहुरीतील पुतळा विटंबना प्रकरणातील चौकशीला गती देऊन संशयित आरोपींना अटक करावी, अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कायद्याच्या चौकटीत ठोस उपाययोजना कराव्यात, संवेदनशील भागांमध्ये पर्याप्त पोलीस बंदोबस्त ठेवून अफवांना आळा घालावा, दोन समाजांत सलोखा टिकवण्यासाठी पोलिसांनी प्रतिनिधींशी संवाद व बैठकांचे आयोजन करावे. आगामी गणेशोत्सव व नवरात्र उत्सवाच्या पार्श्वभूमीवर वाढत्या तणावाला तातडीने नियंत्रणात आणणे आवश्यक असल्याचे खा. लंके यांनी अधोरेखित केले. तसेच आनंदीबाजार, चितळे रस्ता, तेलीखूंट, मुकुंदनगरसह संवेदनशील भागांमध्ये पोलीस बंदोबस्त तैनात करावा, उत्सव काळात सार्वजनिक ठिकाणांवर सतत गस्त घालावी आदी मागण्या करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्हा हा शांततेचा व बंधुत्वाचा आदर्श आहे. काही असामाजिक प्रवृत्ती वातावरण बिघडवण्याचा प्रयत्न करत असल्या तरी नागरिकांनी संयम राखावा. अफवांना बळी पडू नये, असे आवाहनही खा. लंके यांनी केले आहे.

# महिला बचतगटांना सहकार्य करणार- आ. ओगले

### सहा बचतगटांना साठ लाख निधीच्या धनादेशाचे वाटप

**टाकळीभान (वार्ताहर)–** महीला प्रामाणिकपणे प्रपंच सांभाळून, बचत गटाच्या चळवळीचा एक भाग होवून आर्थिक सक्षम होत आहेत. बचत गटाच्या चळवळीमुळे महीलांमध्ये आर्थिक क्रांती घडून येत आहे, महीला बचत गटांना संपूर्ण सहकार्य करुन, महिलांना सक्षम करणार असल्याचे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले.



तालुक्यातील टाकळीभान येथील श्री संत सावता महाराज मंदिराच्या सभागृहात श्रीरामपूर तालुका पंचायत समिती अंतर्गत महीला बचत गटाच्या वार्षिक सर्वसाधारण सभा व समुदाय निधी वाटप मेळाव्यात ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे अध्यक्षस्थानी होते. तर काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, टाकळीभान सोसायटीचे चेअरमन मंजाबापू थोरात, संत सावता माळी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब तनपुरे आदी प्रमुख उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवन्नोनती अभियानांतर्गत पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रातील टाकळीभान जिल्हा परिषद गटातील महीला बचत गटांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन व महीला बचत गटांना गुंतवणूक निधी वाटपाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आ. ओगले म्हणाले की, महीला बचत गटांनी चांगली आर्थिक क्रांती केली आहे. प्रपंच सांभाळून महीला बचत गटाची चळवळ चालवून आर्थिक सक्षम होत आहेत. बचत गटाच्या माध्यमातून छोटे छोटे व्यवसाय करुन अर्थार्जन करीत आहेत. या महीला बचत गटांना यापुढील काळात संपूर्ण सहकार्य करणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

करण ससाणे म्हणाले की, या सर्व बचत गटांनी चोख व्यवहार करुन राष्ट्रीयकृत बँकेत स्वतःची पत निर्माण केली आहे. महीला घेतलेल्या कर्जाचा व्यवस्थित वापर करत असल्याने, आज त्या सक्षम होत आहेत. त्यामुळे कुटुंबालाही मोठा आधार मिळत असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी सचिन गुजर, माजी सभापती डॉ. वंदना मुरकुटे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.

पंचायत समितीचे विस्तार अधिकारी दिनकर ठाकरे यांनी महीला बचत गटासाठीच्या विविध योजनांची माहीती देऊन लाभ घेण्याचे अवाहन केले. यावेळी कारेगाव व भोकर येथील महीलांनी बचत गटामुळे कसा लाभ झाला हे सांगितले. यावेळी टाकळीभान जिल्हा परिषद गटातील सहा सक्षम बचत गटांनी प्रत्येकी १० लाख रुपये याप्रमाणे ६० लाखाच्या धनादेशांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी सरपंच भाऊसाहेब मगर, माजी चेअरमन एकनाथ पटारे, भारत भवार, विलास दाभाडे, रामकृष्ण गायकवाड, प्रकाश दाभाडे, शिवाजी वखरे, अनिल मगर, गोटीराम दाभाडे, मोहन रणनवरे, काका रणनवरे आदींसह टाकळीभान, भोकर, खोकर, कारेगाव, वडाळा महादेव, निपाणी वडगाव, मातापूर येथील बचत गटांच्या महीला उपस्थित होत्या.

# राज्य एरोबिक्स अजिंक्यपद स्पर्धेत ध्रुवचा दबदबा

### सत्तावीस पदकांची कमाई; पुणे येथे झाली स्पर्धा

**संगमनेर (प्रतिनिधी)–** पुण्यात पार पडलेल्या २० व्या महाराष्ट्र राज्य एरोबिक्स अजिंक्यपद स्पर्धेत संगमनेरच्या ध्रुव ग्लोबल स्कूलने आपला दबदबा कायम ठेवला. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत ध्रुवच्या एरोबिक्सपटूंनी चार सुवर्ण आणि डझनभर रौप्यपदकांसह तब्बल २७ पदके पटकावली. इशान उगले, आलोक आरोटे आणि स्पर्श घुले, राजवीर आवारी यांच्या अतिशय लवचिक आणि विद्युत वेगाच्या हालचालींनी उपस्थितांची दाद मिळवली. या स्पर्धेतील यशाने ध्रुव ग्लोबलने राज्यातील एरोबिक्स खेळाच्या क्षेत्रात आपला ठसा निर्माण केला आहे.



ध्रुवच्या एरोबिक्सपटूंनी अतिशय लवचिक आणि वेगवान हालचाली करताना परीक्षकांचे डोळे खिळवून ठेवले होते. मुलांच्या स्पोर्ट् एरोबिक्स प्रकारात दुहेरी यश मिळवताना इशान उगले याने एका सुवर्णसह रौप्य तर, आलोक आरोटेने सुवर्णसह कांस्यपदक मिळवले. स्पर्श घुले आणि राजवीर आवारी या दोघांनीही प्रत्येकी एका सुवर्णसह त्यात आणखी भर घातली. याच प्रकारात प्रथमेश कोळपकर आणि दिव्यांश उगले यांनी रौप्य आणि शौर्य नवले याने कांस्य पदकं मिळवताना संघाची घोडदौड कायम राखली.

सतरा वर्षांखालील मुलींच्या फिटनेस टीम प्रकारात सान्वी गुंजाळ, दिव्याशा सचदेव, सचप्रीतकौर पंजाबी, दीक्षा चेक्किल्ला, समीक्षा खैरनार, अवनी शिंदे आणि सारवी कुँवर यांच्या संघाने चपळ आणि लवचिक सादरीकरण आणि परस्परांशी समन्वयाचा उत्कृष्ट नमुना सादर करताना रौप्यपदकासह दुसरा क्रमांक पटकावला. फिटनेस ड्युएट प्रकारात आराध्या जोशी आणि रिद्धी दर्डा यांच्या जोडीने रौप्य तर, समीक्षा खैरनार आणि दीक्षा चेक्किल्ला यांच्या जोडीने कांस्यपदकं मिळवले.

चौदा वर्षांखालील फिटनेस टीम प्रकारात गुंजल करवा, त्रिशा गांधी, आराध्या जोशी, लब्धी कटारिया, अनिका चांडक, रिद्धी दर्डा व यशश्री लाहोटी यांच्या संघाने परास्परांशी समन्वय आणि जोशपूर्ण सादरीकरणाच्या बळावर कांस्यपदकासह तिसरा क्रमांक पटकावला. पुण्यात तीन दिवस चाललेल्या या स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलच्या एरोबिक्सपटूंनी चार सुवर्ण, बारा रौप्य आणि अकरा कांस्य अशा २७ पदकांची कमाई करताना २० व्या महाराष्ट्र राज्य एरोबिक्स अजिंक्यपद स्पर्धेत आपला दबदबा निर्माण केला. या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, उपाध्यक्ष गिरीश मालपाणी, प्राचार्या अर्चना घोरपडे, क्रीडा विभागप्रमुख गिरीश टोकसे व प्रशिक्षक कुलदीप कागडे यांनी अभिनंदन केले आहे.

# कोतूळ येथे उद्या सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन

**अकोले (प्रतिनिधी)–** कोतूळ (ता.अकोले) येथील इच्छित मनोकामना पूर्ण करणाऱ्या व नवसाला पावणाऱ्या श्री वरदविनायक मंदिरात जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्यावतीने ऋषिपंचमीनिमित्त गुरुवारी (दि.२८) सकाळी सहा वाजता सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री गणेश उपासना ही ऐक्य बंधुभाव वाढवणारी व राष्ट्रीय एकात्मता व कार्यक्षमता वाढवणारी आहे म्हणून या सामुदायिक अथर्वशीर्ष पठणाचे आयोजन करण्यात आले आहे. जय भवानी संस्कृती संवर्धन मंडळाच्यावतीने आयोजित अथर्वशीर्ष पठणाचे हे तेरावे वर्ष असून कोतूळसारख्या ग्रामीण भागात भल्या पहाटे शेकडो गणेश भक्तांचा वाढता प्रतिसाद या कार्यक्रमाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य ठरत आहे. एकाचवेळी शेकडो मुखातून निर्माण होणाऱ्या ध्वनिलहरींनी परिसरातील वातावरण भक्तीमय बनते. अनेक महिला व पुरुष भाविक भल्या पहाटे पायी चालत येऊन या कार्यक्रमात सहभागी होत असतात. यावेळी देवस्थानच्यावतीने प्रसादाचे आयोजन केलेले आहे. सामुदायिक अथर्वशीर्ष पठणासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष प्रदीप भाटे, विनय समुद्र, कुलदीप नेवासकर, संभाजी पोखरकर, संतोष नेवासकर, विशाल बोऱ्हाडे, प्रणव परशुरामी, अनिल पाठक, विजय तोरकडे, सचिन पाटील आदिंनी केले आहे.

# मोदी हे 'सनातन हिंदुत्वाचे पंतप्रधान'-आंबेडकर

**पुणे (प्रतिनिधी)–** देशात सध्या कोणतेही राष्ट्रीय नेतृत्व दिसत नसून, केवळ पक्षीय नेतेच उरले आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे 'सनातन हिंदुत्वाचे पंतप्रधान'आहेत, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी केली. पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने आयोजित वार्तालाप कार्यक्रमात ते बोलत होते.

आंबेडकर यांनी देशातील नेतृत्वाच्या सद्यस्थितीवर भाष्य केले. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी हे शेवटचे असे नेते होते ज्यांनी पक्षाच्या विरोधात देशाला महत्त्व दिले. त्यांच्या नंतर माजी पंतप्रधान मनमोहन सिंग हे राष्ट्रवादी म्हणून पुढे आले, पण त्यानंतर कोणीही राष्ट्रीय नेता म्हणून पुढे आलेलं नाही, असे आंबेडकर म्हणाले. सध्या राज्या-राज्यात लढाई सुरू झाली असून, ती थांबवण्यासाठी राजकीय नेत्यांची आवश्यकता आहे, परंतु आज केवळ पक्षीय नेतेच दिसत आहेत.

जागतिक आणि देशांतर्गत परिस्थितीवर बोलताना आंबेडकर यांनी चिंता व्यक्त केली. डोनाल्ड ट्रम्प यांनी लावलेल्या टेरिफमुळे भारतीय बाजारात परिणाम होऊ शकतो. ऑपरेशन सिंधूरच्या वेळी आपल्यासोबत कोणीही राहिले नाही. इराणसारखे राष्ट्र सुद्धा भारतासोबत आणि पाकिस्तानसोबत देखील आहेत. देशाकडे जगाची अर्थव्यवस्था म्हणून पाहिले जात असताना, पाकिस्तानच्या माध्यमातून छुपे युद्ध सुरू असून भविष्यात वेगवेगळ्या पद्धतीचे दहशतवादी हल्ले होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली.



**श्रीरामपूर येथील मदर तेरेसा चौकी येथे भारतरत्न मदर तेरेसा जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी अभिवादन करताना लोयोला सदन पॅरिसचे धर्मगुरू प्रकाश भालेराव, संतलुक हॉस्पिटलच्या सिस्टर सरोज, सिस्टर प्रभा, सिस्टर अनसी, दीपक कदम, विजय त्रिभुवन, श्री. बोर्जेस, शरद पंडित, ललित गायकवाड, ब्र. निशिकांत पंडित, लाजरस गायकवाड, अश्पाक शेख, सुनील सोनवणे, भाऊसाहेब आढाव, महिला मंडळच्या प्रतिभा पंडित, मंगल गायकवाड आदी.** (छाया- अमोल कदम)